FORM-1A

N.C.R.B.

I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154138

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. 30/2021, वर्ष Year, दिनांक Date 30/06/2021

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधिनियम, कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act भा.द.वि., कलमे Sections 201
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections –

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day सोमवार, तारीख पासून Date from 28/06/2021, वेळ Time 10:00, तारीख पर्यंत Date to 30/06/21, वेळ Time ............

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 28/06/2021, वेळ Time ............

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 01/2021 तारीख Date 30/06/21 वेळ Time 08:00

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी तक्रार अर्ज, लेखी / तोंडी Written / Oral ............

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P. S. 20 कि.मी. [illegible], चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ............

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name दहिसर वाहतूक पोलीस चौकी, कांदिवली (पू), ठिकाणाचे नंबर No. if any ............, गल्ली Ward ............, रस्त्याचे नाव Name of road ............

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place [illegible], गाव Village [illegible], पोस्ट Post ............, तालुका Taluka ............, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ............, तालुका Taluka ............, जिल्हा Dist. ............, राज्य State ............

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name शब्बीर समीर शेख (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name समीर शेख.

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 28 वर्ष. (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 7304786604.

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. –, दिल्याचा दिनांक Date of Issue –, दिल्याचे ठिकाण Place of Issue – (f) व्यवसाय Occupation डिलीवरी

   (g) धर्म Religion –, जात Caste मुस्लिम, जनजात Sub-Caste ............

   (h) पत्ता Address : गेट क्र. ६, प्लॉट [illegible] रूम नं. [illegible], गल्ली / सर्व्हे नं. Ward ............, घर / नाव नं. House/Name No. ............, फोन / मो. नं. Phone/Mo. No. ............, पॅन नं. PAN No. ............, गटर्स नं. Card No. ............

   रस्त्याचे नाव Road मालवणी, मालाड (प) मुंबई, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ............, गाव Village ............, पोस्ट Post ............, पो. स्टे. P Stn. ............

   तालुका Taluka मुंबई, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र, सध्याचा पत्ता Present Address ............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   सुरेंद्र कारभारी घेगडमल वय ५६ वर्ष व्यवसाय नोकरी - सहायक पोलीस निरीक्षक, वाहतूक मुंबई दहिसर विभाग, मुंबई

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

Scanned with CamScanner

दिनांक 30/06/2021

<u>फिर्यादीचा जबाब</u>

खालील फिर्यादी नामे शब्बीर अनवर शेख वय २७ वर्षे, धंदा. डिलेव्हरी बॉय, राहणार गेट नं. ६, प्लॉट नं. २, रूम नं. १२५, मालवणी, मालाड (प) मुंबई यांनी दिलेली फिर्यादी जबाब संगणकावर टंकलिखित केलेला असून त्याची प्रिंट सदर कागदावर काढण्यात आली आहे. फिर्यादी यांनी मजकुराप्रमाणे दिलेली फिर्याद, तिची गुन्ह्याची पाहिली खात्री. समजल्याने येत आहे.

समक्ष.

(स्वप्नील बेडरे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
वरळी, मुंबई.

फिर्याद दि. ३०/०६/२०२१

श्री. शब्बीर समीर शेख, वय २४ वर्षे, धंदा– व्यवसाय (झोमॅटो डिलीव्हरी), रा.ठि.– गेट नं. ०६, प्लॉट नं. २, रूम नं. १२८, मालवणी, मालाड (प.), मुंबई ४०० ०९५. मो.क्र. ७३०४७८६६०४, ८६५२१२०२९३.

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे जन्मापासुन माझे कुटुंबासह रहात आहे. मागील ०३ वर्षापासुन मी झोमॅटो डिलीव्हरीचा व्यवसाय करीत आहे. त्याकरीता मी माझ्या दुचाकी होंडा डिओ क्र. MH-47-AF-2758 चा वापर करतो. रविवार दिनांक २७/०६/२०२१ रोजी मी झोमॅटोच्या ऑर्डर करीता दुपारी ०१.०० वा. चे सुमारास मी माझी दुचाकी होंडा डिओ क्र. MH-47-AF-2758 ने कांदिवली पुर्व येथील पश्चिम दृतगती महामार्गाच्या पुलाखालील दहिसर वाहतूक चौकी समोरील ठाकुर कॉम्प्लेक्स जंक्शन सिग्नल क्रॉस करीत असताना दुचाकी वाहन झेब्रा क्रॉसिंगवर उभी राहिल्याने सदर ठिकाणी कर्तव्यावर असलेले वाहतूक विभागाचे श्री स्टार अधिकारी श्री. घेगडमल यांनी माझी गाडी अडवली. गाडीची चावी ताब्यात घेऊन मला माझी गाडी सिग्नलसमोरील दहिसर वाहतूक चौकीचे आवारात उभी करण्यास सांगीतली. पोलीस अधिकारी श्री. घेगडमल यांच्या सांगण्याप्रमाणे मी माझी दुचाकी नमुद वाहतूक चौकीचे आवारात पार्क केली. त्यावेळी घेगडमल साहेबांनी माझे नमुद दुचाकी वाहनावर रू ८,०००/– चे फाईन असल्याचे मला सांगून ते एका तासात भरण्यास मला सांगीतले. त्यानंतर मी साधारणपणे एक तास नमुद वाहतूक चौकीच्या बाहेर उभा राहिलो. त्यावेळी पोलीस अधिकारी श्री. घेगडमल यांनी मला रू. ८,०००/– चे चलान भरावयाचे नसल्यास तु रू. २,०००/– चलानापोटी व रू. २,०००/– माझेसाठी असे मिळून एकुण रू. ४,०००/– अदा केल्यास माझी दुचाकी मोटार सायकल माझे ताब्यात देतील असे सांगीतले. त्यावेळी माझेकडे तेवढे पैसे नसल्याने मी त्यांना तसे सांगीतले असता त्यांनी मला सांगीतले की, " उद्या पैसे घेऊन ये तेव्हाच तुझी गाडी सोडीन". माझे नमुद दुचाकी वाहन सोडवून घेण्याकरीता घेगडमल साहेबांना लाच म्हणुन रू. २,०००/– देण्याची माझी इच्छा नसल्याने मी सदर बाबत सोमवार दिनांक २८/०६/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई या कार्यालयात व्यक्तीश: जावून तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटलो. तेव्हा त्यांनी कार्यालयातील पोलीस अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयात बोलावून माझे तक्रारीबाबत कारवाई करण्याबाबत सांगीतले. त्यानुसार पोलीस निरीक्षक श्री. बेडसे व श्री. लांघी यांनी माझेकडे माझे तक्रारीबाबत चौकशी करून लेखी तक्रार अर्ज मागीतल्याने मी त्याप्रमाणे वाहतूक पोलीस अधिकारी श्री. घेगडमल यांच्या विरोधात लेखी तक्रार अर्ज दिला.

मी दिलेल्या लेखी तक्रारीवरून सदर कार्यालयाचे पोलीस निरीक्षक श्री. बेडसे, श्री. लांघी यांनी माझे तक्रारीची पडताळणी करून पुढील कारवाई करण्याकरीता आवश्यक त्या सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून दोन सरकारी पंचासमवेत सापळा पथकासह शासकीय वाहनाने अत्यावश्यक त्या साधनसामुग्रीसह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथुन निघालो.

मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता पोलीस निरीक्षक श्री. बेडसे व श्री. लांघी यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पंचासमक्ष माझे शर्टाचे आत बनियनला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर लावून सोबत असलेल्या दोन शासकीय पंचापैकी शासकीय पंच श्री. पिंपळशेंडे यांचेसह मी घेगडमल साहेब कर्तव्यास असलेल्या कांदिवली पुर्व येथील दहिसर वाहतूक चौकीत घेगडमल साहेबांची भेट घेण्याकरीता गेलो व त्यांची भेट घेतली. सदरवेळी घेगडमल साहेब व माझेत झालेले संभाषणात घेगडमल साहेबांनी माझी अटकाऊन ठेवलेले दुचाकी मोटार वाहन मला परत करण्याकरीता माझे गाडीवर असलेल्या फाईनपैकी रू. २,०००/– फाईन भरून रू. २,०००/– इतक्या रक्कमेची माझे वाहन सोडण्याकरीता लाचेपोटी मागणी केली. त्यावेळी मी माझे गाडीवर असलेल्या फाईनपैकी रू. २,०००/– व घेगडमल साहेबांना माझी गाडी सोडण्याकरीता लाचेची रक्कम रू. २,०००/– देण्यास सहमती दर्शविली.

Scanned with CamScanner

त्यानंतर काही वेळाने पुन्हा मी फाईनकरीता भरावयाचे रू. २,०००/— भरणा खिडकीवर भरावयास गेलो असता तेथे माझे नमुद वाहनावर असलेल्या फाईनची पावती माझेकडे नसल्याने व सदरचे फाईन मोबाईल फोन मध्ये असल्याने, त्याची प्रिंट माझेकडे नसल्याने उद्या प्रिंट आणुन दुपारी अकरा, बारा, एक वाजताचे सुमारास फाईनचे सर्व पैसे भरण्याबाबत घेगडमल साहेबांनी मला सांगीतले.

श्री. घेगडमल साहेबांनी अटकावून ठेवेलेले माझे दुचाकी वाहन सोडविण्याकरीता व त्यांचे विरूध्द मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे काल दिनांक २८/०६/२०२१ रोजी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याकरीता वाहतूक पोलीस अधिकारी श्री. घेगडमल साहेबांनी सांगीतल्याप्रमाणे आज मंगळवार दिनांक २९/०६/२०२१ रोजी पोलीस निरीक्षक श्री. बेडसे व श्री. लांघी यांचे सुचनेप्रमाणे आवश्यक त्या सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून दोन सरकारी पंचासमवेत व सापळा पथकासह शासकीय वाहनांनी अत्यावश्यक त्या साधनसामुग्रीसह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथुन निघालो. पोलीस निरीक्षक श्री. बेडसे व श्री. लांघी यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे घेगडमल साहेबांना लाचेपोटी दयावयाचे रू. २,०००/— हे रू. ५००/— दराच्या ०४ भारतीय चलनी नोटा ज्यांना पंचासमक्ष अॅन्थ्रासिन पावडर लावलेली आहे तसेच माझे वाहनाचे फाईनपैकी भरावयाचे रू. २,०००/— सोबत घेऊन माझे शर्टाच्या आत बनियनला पंचासमक्ष माझे शर्टाचे आत डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर लावून सोबत असलेल्या दोन शासकीय पंचापैकी शासकीय पंच श्री. पिंपळशेंडे यांचेसह मी वाहतूक पोलीस अधिकारी श्री. घेगडमल साहेब हे कर्तव्यास असलेल्या कांदिवली पुर्व येथील दहिसर वाहतूक चौकीत घेगडमल साहेबांची भेट घेण्याकरीता गेलो व तेथे चौकशी केली असता घेगडमल साहेब हे दहिसर चेकनाका येथे बंदोबस्तासाठी गेले असल्याचे व ते १५ ते २० मिनीटात परत येणार असल्याचे समजले. त्याप्रमाणे मी व पंच श्री. पिंपळशेंडे असे आम्ही दोघे सदर चौकीच्या बाहेर घेगडमल साहेबांची वाट पाहत उभे राहिलो. परंतू १५ ते २० मिनटानंतरही घेगडमल साहेब न आल्याने मी पुन्हा चौकीत जावून चौकशी केली असता थोडया वेळाने साहेब येतील असे समजले. त्यानंतर मी पंच श्री. पिंपळशेंडे यांच्यासोबत चौकीच्या बाहेर थांबून राहिलो असता साधारणत तासाभराने घेगडमल साहेब त्यांच्या बुलेट मोटार सायकलवरून आले व त्यांनी त्यांची बुलेट मोटार सायकल चौकीच्या गेट समोर पार्क केली व ते त्यांच्या कार्यालयात गेले व कार्यालयाचे उजवीकडे असलेल्या पहिल्या रूम मध्ये गेले. त्यानंतर काही वेळाने मी सदर रूमला असलेल्या खिडकीतून बाहेरूनच त्यांना सांगीतले की, साहेब मी झोमॅटो वाला फाईन भरावयाचा होता ना. त्यावर घेगडमल साहेबांनी मला सांगीतले की, जा मागे जावून खिडकीवर फाईन भरून घे. त्याप्रमाणे मी फाईनच्या खिडकीवर जावून रू. २,०००/— फाईन भरला व त्याची पावती घेवून घेगडमल साहेबांकडे गेलो. घेगडमल साहेब मला चौकीच्या बाहेर घेऊन आले व त्यांनी दोन बोटांनी खुणवून इशारा केला त्यावर मी त्यांना विचारले की, साहेब पुर्ण २,०००/— दयावे लागतील का? त्यावर त्यांनी सांगीतले की, होय पुर्ण. त्यावर मी माझेकडील अॅन्थ्रासिन पावडर लावलेल्या ५००/— च्या ०४ भारतीय चलनी नोटा त्यांना देऊ केल्या असता त्यांनी माझेकडे असलेली इतर खर्चाची रक्कम देखील पाहिली व मला बोलले की तुझेकडे पैसे आहेत तर भरून टाक. त्यावेळी मी त्यांना ते माझे खर्चाचे पैसे असल्याचे सांगीतले. त्यानंतर त्यांनी मला चौकीशेजारी असलेल्या गार्डनच्या कट्टयावर त्यांना देऊ करावयाची रक्कम ठेवण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी लाच म्हणुन दयावयाच्या अॅन्थ्रासिन पावडर लावलेल्या रू. ५००/— दराच्या एकुण ०४ भारतीय चलनी नोटा चौकीशेजारील गार्डनच्या कट्टयावर ठेवल्या व जवळच उभ्या असलेल्या घेगडमल साहेबांकडे गाडीच्या चावीची मागणी केली. त्यावेळी घेगडमल साहेबांनी मंग्या नावचे इसमास आवाज दिला असता तेथे एक युवक आला असता त्याचेकडे पाहून घेगडमल साहेबांनी त्याला काही दिले काय असे विचारून त्यास रू.१००/— देण्यास सांगीतले.

समक्ष,

( स्वप्निल बेडसे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with CamScanner

**फिर्यादी श्री. शब्बीर समीर शेख यांचा दि. ३०/०६/२०२१ रोजीचा जबाब पुढे चालू....**

घेगडमल साहेबांनी सांगीतल्याप्रमाणे मी मंग्या नामक इसमास रू. १००/– ची एक नोट दिली. त्यानंतर घेगडमल साहेबांनी मला गाडीची चावी दिल्याने मी तेथुन निघुन गेला परंतू जाताना काही अंतर गेलो व मागे वळून पाहिले असता घेगडमल साहेबांनी लाचेची रक्कम उचलल्याचे मला दिसले. त्यानंतर मी थोडे पुढे येऊन थांबलो असता मला घेगडमल साहेब त्यांच्या कार्यालयातील कॅबिनमध्ये जात असल्याचे दिसल्याने मी माझे चेहऱ्यावरील मास्क काढून त्याने चेहरा पुसुन इशारा केल्याने लागलीच पोलीस निरीक्षक श्री. बेडसे व श्री.लांघी यांनी तसेच त्यांच्या सोबत सापळा पथकातील अंमलदार व पंच हे माझे जवळ आले असता मी त्यांना घेगडमल साहेबांच्या कॅबिनमध्ये घेऊन गेलो. त्यावेळी घेगडमल साहेब हे जेवण करण्यास बसले होते. मी घेगडमल साहेबांकडे अंगुदी दर्शक इशारा करून हेच घेगडमल साहेब असल्याचे सर्वांना सांगीतले. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री. बेडसे व श्री. लांघी यांनी घेगडमल साहेबांना स्वत:ची ओळख सांगीतली व घेगडमल साहेबांनी घेतलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत त्यांच्याकडे विचारणा केली. परंतू घेगडमल साहेबांनी लाचेची रक्कम स्विकारलीच नसल्याचे सांगून श्री. बेडसे व श्री. लांघी यांना उडवा उडवीची उत्तरे देऊन स्विकारलेली लाचेची रक्कम सादर केली नाही किंवा त्याबाबत कोणतीही माहिती दिली नाही.

दिनांक २७/०६/२०२१ रोजी मी झोमॅटोच्या ऑर्डरकरीता दुपारी ०१.०० वा. चे सुमारास माझी दुचाकी होंडा डिओ क्र. MH-47-AF-2758 ने कांदिवली पुर्व येथील पश्चिम दृतगती महामार्गाच्या पुलाखालील दहिसर वाहतूक चौकी समोरील ठाकुर कॉम्प्लेक्स जंक्शन सिग्नल क्रॉस करीत असताना दुचाकी वाहन झेब्रा क्रॉसिंगवर उभी राहिल्याने सदर ठिकाणी कर्तव्यावर असलेले वाहतूक विभागाचे ए.पी.आय श्री. घेगडमल यांनी माझी गाडी अडवली. गाडीची चावी ताब्यात घेऊन मला माझी गाडी सिग्नलसमोरील दहिसर वाहतूक चौकीचे आवारात उभी करण्यास सांगीतली व माझे नमुद दुचाकी वाहनावर रू ८,०००/– चे फाईन असल्याचे मला सांगून त्यांनी अटकवून ठेवलेले माझे दुचाकी वाहन मला परत करण्याकरीता माझेकडे रू. २,०००/– ची लाचेची मागणी केली व दिनांक २९/०६/२०२१ रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक वाहतूक विभागाचे थ्री स्टार अधिकारी ए.पी.आय श्री. घेगडमल यांनी दहिसर वाहतूक चौकी येथे लाचेची रक्कम रू. २,०००/– स्विकारून नमुद रक्कमेचा पुरावा नष्ट करण्याच्या हेतुने विल्हेवाट लावली म्हणुन लोकसेवक ए.पी.आय श्री. घेगडमल यांचे विरूध्द माझी कायदेशीर तक्रार आहे

माझी वाहतूक विभागाचे लोकसेवक ए.पी.आय श्री. घेगडमल यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मला हिंदीतुन समजावुन सांगितली असता, ती मी सांगितल्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

(स्वप्निल बेडसे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with CamScanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ............ तात्काळ ............

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........................................................................................

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ............ — ............

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ............ — ............

Unnatural / Accidental Death Case No., if any

पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपी लोकसेवक याने फिर्यादी हे दि. २७।१।२०२१ रोजी ऑर्डरची डिलेव्हरी देण्यासाठी जात असताना कोंढवा बाकर कॉम्प्लेक्स जंक्शन कोंढवा (बु) येथे सिग्नलला त्यांची मो/स्कुटर झेब्रा क्रॉसिंगवर अडवून त्याच्या गाडीवर रु. ६०००/- चा दंड भरण्यास सांगून रु. २,०००/- लाचेची मागणी करून सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांनी हवालदार वाहतूक पो. चौकी येथे लाचेची रक्कम स्विकारुन नमुद रकमेचा पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने विल्हेवाट लावली म्हणून गुन्हा नोंद.

केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

............ स्वाति बेडसे, पोलीस निरीक्षक ............

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank............... No...............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. ..................................................
District.................................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

तक्रारदाराची सही व अंगठा [signature]
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. [signature]
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name स्वाति बेडसे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अ. चा कोड क्र. ............
Posting
Code No. of I. O. ............

1. न्यायालयास सादर केल्याची तारीख....................
1. Date and time of submitted to the Court

2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report .

Scanned with CamScanner